Vol 4 Issue 9 March 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# *पुरुष प्रधान संस्कृतीचा उदय*

*तुकाराम परसराम डोके*

दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

***सारांश :-*** पुरुष प्रधान संस्कृतीचा उदय झाला तरी कसा आजपर्यंत शालेय शिक्षणात इतिहास विषयात जे काही शिकवले गेले त्याच्या आधारावरुन पुढे मी या लेखात याचे विश्लेषण देत आहे. प्रथम निसर्ग निर्मितीचा व त्या पाठोपाठ पृथ्वीवर बदल कसे होत गेले या बदलात आज तागायत सर्व प्राणीमात्रांवर आपल वर्चस्व ठेवून या पृथ्वीवर नवनवीन संशोधन करत आहेत. मानव जातीच्या प्राण्यांची कशी निर्मीती आणि बदल होत गेला याचे सविस्तर वृतांत अगदी साध्या सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या काळात या आदिमानवाची खाण्या पिण्याची मोठी शर्यत होती आपले अस्तित्व टिकवण्याकडे कल असतानाच या पुरुष संस्कृतीचा उदय झाला. हे मला अत्यंत नवलाईचे वाटते.

### *प्रस्तावना*

४५०० दशलक्ष वर्षापूर्वी निर्मिती झाली. पृथ्वीच्या निर्मितीनंतर बराच काळ असाच निघून गेला, कि पृथ्वीतलावर काहीच बदल झाला नाही. आजची ही सजिवसृष्टी पृथ्वी निर्मितीनंतर काही काळ नव्हती. कालांतराने पृथ्वीवर बदल होत गेला आणि इथे एक प्रकारचे नव नविन सजीवांची निर्मिती होउु लागली. निर्माण झालेल्या जिवाणुमध्ये आणखी काही कालानुक्रमे लक्षणीय बदल होत गेला. शेवटी एक असा समय येवून ठेपला ज्याला आज आपण पाहतो आणि व्याख्या करतो निसर्ग. तो अस्तित्वात आला.

अस्तित्व

निसर्ग निर्मितीनंतर प्राणी, पक्षी, झाडे, वेली, फुले, किडे यांनी पृथ्वीचे रुप जवळपास वेगळेच झाले होते. या होणाऱ्या बदलातून नवीन प्रजातींची निर्मिती अस्तित्वात येणार याची साक्ष देत होते. साक्ष देत असतानाच पृथ्वीतलावरच्या निसर्गात काही बदल होत असतानाच एका अप्रतीम प्राण्याची जात अस्तित्वात आली. निसर्ग नियमानुसार बदल घडतच होता. होणाऱ्या बदलांत अस्तित्वात आलेल्या या नवीन प्राण्याच्या जातीत इतका झपाटयाने बदल होत होता की या प्राण्याची सुरूवातीला इतर प्राण्यासारखे श्शारिरीक अवस्था असुनसुध्दा या प्राण्यात बुध्दी मात्र खूप गतीने विकसीत होत होती. इतर प्राण्यापेक्षा वेगळ रुप हा प्राणी धारण करत होता. शेवटी तो इतर प्राण्यांपेक्षा वेगळ रुप धारण करुन आज तागायत स्वतः वेगळा असल्याचे सिध्द करतो. इतर प्राण्यावर आपली वचक ठेवून ता त्याच अस्तित्व टिकवून ठेवत आहे. निसर्गाच्या बदलत्या नियमांनुसार प्राणी जातीच्या नविन अस्तित्वात आलेल्या प्राण्याने सुरवातीलाच स्वतःमध्ये बदल करुन घेण्यास सुरुवात केली. जे अवगत नाही ते अवगत करुन घेण्यास यशस्वी होत गेला तो आपल्या उदर निर्वाहासाठी झाडांची पाने, फळे, फुले आपले प्रथम अन्न म्हणून खावू लागला. नंतर शिकार करु लागला. राहण्यासाठी झाड खडक किंवा गुंडांचा सहारा घेउू लागला स्वतःच्या रक्षणाची काळजी करु लागला. संरक्षणाच्या काळजीत तो स्वतःसारख्याच इतर प्राण्यांचा शोध घेउु लागला. शोधाअंती तो एक समुह करुन राहू लागला.

### *आरंभ*

समुहाने रात असतानाच विकसित होत असलेल्या बुध्दीच्या बळावर हा प्राणी पुढे आपले विश्व निर्माण करु लागला. सुरुवातीला याची ओळख इतिहास संशोधकांनी आदिमानव असे करुन दिली आहे. ज्याला कुठलीच जात पोटजात किंवा धर्म नव्हता. तो फक्त निसर्ग धर्माचा माणुस जातीचा पृथ्वीतलावारचा एक पूर्ण यशस्वी प्राणी होता. हा आदिमानव नावाचा प्राणी एकत्रीत राहत असताना पुढे या प्राण्याला एक असा प्रश्न पडला कि आपण येथे एकत्र समुहात

राहत असुन शरिराने जवळपास एकसारखेच दिसत असून, आपल्या या समुहात दोन प्रकार कसे पडतात या प्रश्नाचे उत्तर श्शोधत असताना आदिमानवाला आपल्यात दोन गट आहेत हे समजते. ते कसे यावर विचार करता त्याला निरीक्षणातून स्त्रि व पुरुष या विभक्त लिंगांची नावे पुढे आली. स्त्रि - पुरुष हे श्शब्द जरी त्यावेळी भाषा अवगत नव्हती तरी ते त्यानी मान्य केले होते. आदिमानव एकत्रीत राहत असल्याने एकमेकांना बोलण्यासाठी संवादाची गरज भासु लागली आणि ती जणू त्या काळाची गरचज ठरली. कालांतराने इशा-याने संवाद साधले गेले. इतर प्राण्यांची हुबेहुब नक्कल करुन एक विशिष्ठ आवाजाच्या सहायाने एकमेकांपर्यंत पोहचण्याचे व संवादाचे साधन बनले. हे साधन हळुहळु एका विशिष्ठ भाषेचे स्वरूप धारण करत होते. या आवाजाच्या विविध छटा आणि तरंग बनत गेल्या आणि त्याचं रूपांतर भाषेत होऊ लागले व ते नावारूपास आले.

भाषेचा तर शोध लागलाच पण इतर प्राण्यांच्या निरीक्षणानेच स्वतःतपण निरिक्षणे केले. त्याच्या निरिक्षणातून त्याला आपल्या आणि आपल्या सोबत राहणा-यामधला फरक समजू लागला. स्त्रि व पुरूष या दोन गटातील एक स्त्रि ही अचानकपणे होणा-या हल्याला प्रतिकार इतक्या प्रतिकारने करू शकत नाही. पुरूष हा मजबूत असल्याने तो पुढाकाराने सर्व जबाबदारी स्वतःवर घेऊ लागला. आणि स्त्रिचे रक्षण करू लागला. रक्षण करताना अन्न म्हणून मोठया प्राण्यांची शिकार करू लागला. यामधील एक महत्वाचा भाग म्हणजे आदिमानव झाडांच्या पानांचा व सालींचा तसेच शिकार केलेल्या प्राण्यांची कातडी तो आपले वस्त्र म्हणून वापरू लागला. दगडापासून व मृत प्राण्यांच्या हाडांपासून हत्यारे बनवू लागला, पूढे जावून त्याच हत्यारांचा वापर शिकारीसाठी करू लागला. निसर्गाचे तर बदल चालूच होते चालत्या बदलात असाच एक अचानक बदल झाला तो म्हणजे जंगलात वणवा पेटला. ज्वाळा पेटल्याने पूर्ण अधिवासच नष्ट झाला. यामूळे खूप सजीव संपत्ती नष्ट तर झालीच याचा प्रत्यक्ष साक्षीदार होता त्यावेळचा माणूस. त्या घटनातून त्याने खूप काही शिकवण घेतली. पण हीच आग कृत्रिम रित्या तयार करण्यात आदिमानवाला यश आले आणि त्याने गारगोटयांपासून तसेच लाकडांच्या घर्षणातून आग निर्माण करू शकला. तेथूनच सूरूवात झाली अन्न शिजवून व भाजून खाण्यास. परीणमतः आग ही एक संरक्षणासाठी व दैनंदिन वापरासाठी महत्वाचा घटक आहे हे जाणले.

एकत्रीत समुहाने राहत असल्याने पुढे चालून हा मानव एकाच ठिकाणी निवास करू लागला व निवासाने एक बदल घडला तो म्हणजे राहण्यासाठी गुहा किंवा झाडांच्या ओंडक्यांची छपरे बांधू लागला. आपले जीवन सुखकर करण्यामागे धावू लागला. याच धावपळीत बुध्दीच्या जोरावर चाकाचा शोध लागला. जो इतिहासातील सर्वात महत्वाचा शोध मानला जातो. चाकाच्या शोधाने आदिमानव आपल्या जिवनात दूरगामी बदल घडवून आणला. पण पोटासाठी दररोज भटकंती करावी लागत या भटकंतीवर विचार करताना श्शेती नावाचा एक घटक त्याच्या नजरेपूढे आला व तो जसे शिकारीसाठी हत्यारे बनवत त्यासम तो श्शेतीसाठी दगडाची, लाकडाची किंवा हाडांची अवजारे बनवू लागला व भटकंती थांबली. श्शेती करून तो एक स्थिर जीवन जगु लागला. तो स्थिरावला.

### *संस्कृती*

निसर्गाचा हा बदल काही एक दोन दिवसांचा किंवा दहा बारा वर्षांचा नाही. यासाठी लाखो हजारो वर्षे लोटली. तेंव्हा हा बदल निदर्शनास आला. एवढयावर थांबला नाही, तो बदल पुढे चालूच राहिला. निसर्गात जसा बदल घडत होता तसा या बुध्दीवान आदिमानवाने तो बदल स्वतःहून करुन घेतला होता. त्याप्रमाणे तो वागू लागला त्याची खाण्या पिण्याची, चालीरित्यांची, बोलण्याची किंवा वागण्याची एक वेगळीच कला होती. तीच पूढे लोकसंस्कृती म्हणून नावारूपास येवू लागली. संस्कृती म्हणून संबोधु लागली. आदिमानव, अश्मयुगीन मानव जातीच्या प्राण्याची ओळख इतिहासात आदिमानव म्हणून आहे याची वागणूक तेथिल परिसर आणि पर्यावरणावर अवलंबून आहे. द-या खो-यात अन्नसाठी भटकंती करणारा, त्या माणसाचे जगणे हे त्या परिसरातील वृक्ष-वेली, फुले-फळे, पशु-पक्षी यांवर अवलंबून होते. बुध्दीच्या जोरावर हा प्राणी दिवसेन दिवस विकसीत होत होता व विकासही करत होता. भिंतीवर चित्रे काढणे, चित्रलेखन करणे, कोरिव काम करणे असं बरेच नवनवीन प्रयोग करू लागला. हे करत असतानाच माणसाच्या निदर्शनात एक गोष्ट आली की आपल्यासारखीच अनेक ठिकाणी आपली प्रजाती राहत आहे. कालांतराने तो एक संस्कृतीत विलीन होत चालला होता. हा बदल शिक्षण नावाच्या गोष्टीतुन केला असावा असा बराच इतिहासकारांचा दावा आहे.

### *वर्तमान*

आजच्या दिवसाला ही पूर्णतः बदलेली परीस्थीती आपण पाहत आहोत आणि जगतही. अलिकडे म्हणजे इ.स. १३०० ते १६०० दरम्यान हाच माणूस प्राणी जो एकेकाळी एकत्रीत समुहाने एकाच संस्कृतीत या निसर्गात राहणे पसंत करत होता पण तो त्याच्या वर्चस्वासाठी आपापसात लढु लागला. ही लढाई वाढत वाढत पूढे एका राज्याच्या व सत्तेच्या रुपात बदलत गेली. आपले वर्चस्व टिकवण्यासाठी माणुस नावाच्या जातीवर माणुस प्राणी हल्ले करु लागले. हे हल्ले करत असताना ब-याच ठिकाणी स्थलांतर करावे लागत असल्याने नविन गोष्टी, बोली, भाषा, संस्कृती या वेगळया प्रकारच्या निदर्शनात आल्या. निदर्शनास आलेली हीच गोष्ट पुढे जाती-धर्माच्या नावात रूढ झाली. इथूनच जात धर्माचा उल्लेख पुढे होऊ लागला. जाती धर्माची गोष्ट निदर्शनास आली होती. ती फक्त बोली भाषा व जाती पातीवर न थांबता ती संस्कृती वर्चस्वासाठी झगडू लागली. पुढे कालांतराने ती विस्तारली. मानव नावाचा प्राण्यात स्पर्धा सुरू झाली. आज आपण पाहतोय तीच स्पर्धा कोणत्या स्थरापर्यंत पोहचली आहे. पण या स्पर्धेत एक महत्वाचा अंश म्हणजे विशाल या सृष्टीत निरनिराळया प्रकारची भाषा, संस्कृती, रूढी परंपरा, चालीरीती निर्माण झाल्या. हे जरी धर्मप्रचारासाठी लढत

असले तरी त्यानी एक गोष्ट प्रत्येक धर्मातील लोकांनी ओळखली होती. ती म्हणजे स्त्रि नावाची व्यक्ती ही सक्षम नाही व तिचे संरक्षण करणे हे पुरूषाला क्रमप्राप्त आहे आणि ते केलेच पाहिजे. हे कर्तव्य आदिमानवाने तेव्हाच जाणले होते. स्त्रि रक्षणासाठी त्यावेळी असुरक्षितता असतानासुध्दा त्या लोकांनी स्त्रीला संरक्षीत करण्याची जबाबदारी हाती घेतली. त्यानुसार नियमांची एक राजसत्ता बनली व एका नुसार अशा अनेक बनत गेल्या हे नक्की. आपल्या देशात मुघल, निजाम व मराठे अशा अनेक राजघराण्यांच्या सत्ता होत्या. पण हेतु मात्र एकच होता. सत्ता काबीज करणे व ते करत असताना स्त्रि वर्गाची फरफट होऊ न देणे म्हणून सर्वजण दक्षता घेणे हे एक होते.

### *पुरूष प्रधान संस्कृती*

स्त्रि ही निसर्गात वावरताना अचानक होणा-या इतर कोणत्याही हल्याला पूर्णपणे सक्षम नसल्याने तिचे रक्षण करणे हे पुरूषाने स्वतःच्या खांदयावर घेतले. इथूनच एक परिवर्तनीय गोष्टीचा उदय होत गेला. इथेच झाला असे मी म्हणत नाही पण त्यावेळी माणूस नावाच्या प्राण्याची निर्मिती झाली व तो ज्यावेळी समुहाने एकत्र राहू लागला तेथुन ते आजपर्यंत एक अशी संस्कृती उदयास आली आहे. ती तशीच पुढे राहणार आहे ती आजतागायत दडलेली आहे. या संस्कृतीत खूप विचार करून त्यांच्यावर अन्याय अत्याचार होऊ नये यासाठी अनेक कायदे नियम अश्मयुगापासुन तयार होत गेले. ते अंमलातही आले. एकंदर आदिमानवानेसुध्दा स्त्रि ही आपली अस्तित्व वाढवणारी व टिकवणारी एक दैवीशक्ती आहे. हे मानुन तिचे रक्षण सर्व पृथ्वीतलावर तो करत होता. आपल्याला चांगला कळणारा काळ म्हणजे राजघराणे पध्दतीतही हा प्रयत्न शेवटपर्यंत तसाच चालू होता. राज्यघराणेशहीन स्त्रियांवर काही प्रमाणात अन्याय झाला असे मी म्हणू शकत नाही. पण जो अन्यायकर्ता होता तो क्रुर होता. त्याच्या विरोधात प्रत्येक वेळी सर्वसामान्य स्त्रिरक्षणासाठी सर्वसामान्य समाजाने आपले पाऊल उचलले होते. पण हे होत असतानाच राजेशाही घराण्याची हुकुमशाही माळवतीकडे झुकत होती. परकियांची आक्रमणे झाल्याने अनेक राजघराणे बुडाले. गुलामी वाढली पारतंत्र्याच्या काळात स्त्रि अबला झाली पण समाजाने माघार घेतली नाही. अनेक समाजसुधाराकांनी या अन्यायाला समान उत्तर सतत दिले. आपण आता लोकशाहीच्या आधुनिक काळात जगत आहोत. या काळातही स्त्रियांवर अन्याय अत्याचाराचा वार चालू आहे. ती आणखी अबला बनत आहे. याचा विचार करताना या आधुनिक काळात मी असे म्हणतो की स्त्रि सुरक्षित आहे का? याचे उत्तर ’नाही’ असेच म्हणावे लागेल. मी आज असे म्हणजेन की स्त्रि सुरक्षित असा एक काळ होता. याची कारणे कधी डोकावून पाहिली तर ती फक्त कागदावरच ती उतरून कागदावरच राहिली. समाजाच्या कानाकोप-यात आली नाही. कारण आजही स्त्रियांवर अन्याय अत्याचार होतोच फरक फक्त इतकाच की लोकशाहीमुळे त्यात कमी जास्त प्रमाण होत राहतं. पण स्त्रियांवरीत अन्यायाला जबाबदार शासन, पुरूष कि त्या स्वतःच आहेत. वर्तमानातील बदलत्या राहणीमान, वस्त्रपरिधान, बोलण्या-चालण्याची शैली, वागणुकितील हालचाली, आसपासचे वातावरण अशा अनेक गोष्टीत त्या स्वताच सुरक्षित नसण्याला कारणीभूत आहेत. आपण अभ्यासलेला मानव इतिहासाचा जिवनकाळ काही ठळक बाबी लक्ष्यात आल्या. जिथे स्त्रियांना घराबाहेर पडण्याची परवानगी नसायची. जरी ती बाहेर पडली तरी घरचे दोन चार पुरूष तिच्यासोबत असायचे. डोक्यावरून पूर्ण पदर. स्वयंपाक घरात जास्त वेळ म्हणजे चूल आणि मुल. स्वयंपाक घराच्याच बाजूला उठण्या बसण्याची व आराम करण्याची सोय. मुला मुलींना न विचारताच त्यांचा बालविवाह करणे. पतीच्या पश्चात स्त्रिने सती जावे. पतीच्या मृत्युनंतर स्त्रीने मुंडन करणे. विधवेने घराबाहेर न पडणे. पत्नीच्या पश्चात पतीने सन्यास घेणे. तीचा देव-धर्मांच्या रूढी परंपरेत सहभागी नसणे. लोकशाही नसतानासुध्दा असे अनेक कायदे रूढ होते. समाजाच्या कानाकोप-यात स्त्रि अबला होऊ नये तिला घरची माय, माता, लक्ष्मी म्हणून वागणूक दयायचे. हे सर्व नियम स्त्रियांवरच का होती. या कारणाचा शोध आता आपण घेतला पाहिजे. ही जी बंधन स्त्रियांवर होती ती अन्याय नसुन तिच्या हितासाठीच एक उचलेलं पाऊल होतं. कारण स्त्रि ही घरची इज्जत मानली जायची. ती आजही मानली जाते. त्या काळी गावातील बरेच पुरूष सैन्यात भरती असायचे किंवा अश्मयुग म्हटलं तर शिकारीसाठी जंगलात पडलेले असायचे. याच काळात स्त्रि ही कुणा परक्या वाईट नितीमत्तेच्या पुरूषाच्या नजरेत पडू नये किंवा अश्मयुगात कुणा दुस-या हिंस्त्र प्राण्याच्या नजरेत पडू नये यासाठी ही सारी बंधने होती. मला मान्य आहे कि या बंधनात त्यांची मानसिकता, त्यांच्या भावना त्यांच्यातील हुशारीपणा अशा अनेक गोष्टी जशाच्या तशाच दडपून राहुन होत्या. मोकळेपणा कसलाच नव्हता. पण हे सारं जे होतं ते त्यांच्या हितासाठी होतं. आज आपण पाहतो आणि अनुभवतोही की स्त्रि घराबाहेर पडण्यापासून ती घरी येईपर्यंत किती काळजीत असतो. समाजात जिथे स्त्रि अबला होता कामा नये याची दक्षता घेतली जाते. स्त्रियांवर अन्याय होऊ नये म्हणून जी जी बंधने कायदे नियम त्याकाळी रूजू केले होते तिथेच पुरूष प्रधान सुस्कृती उदयाला येत होती. इथेच या प्रमुख यजमान पदाचा सर्वोदय झाला.

पुरूष प्रधान संस्कृतीची व्याख्या अशी करता येईल, ’स्त्री रक्षणासाठी व स्त्री हितासाठी इतिहासपूर्व काळापासून आजपर्यंत जी नियमावली झाली त्याची अंमलबजावणीत आले व ते सक्तिचे केले.’ जेव्हा आदिमानव नावाची माणसाठी या पृथ्वीवर निर्मिती झाली ती माणसाची जात जशी एकत्र समुहाने राहू लागले तेव्हापासून ख-या अर्थाने पुरूष प्रधान संस्कृतीचा उदय होत गेला. अगदी पूर्व वर्तमानात पाहता १३००-१६०० या काळात बारकाईने निरिक्षण केल्याने पुढे अशी गोष्ट निदर्शनास आली की याही काळात पुरूष प्रधान संस्कृतीचा विचार करता ख-या अर्थाने स्त्रि ही समाजात एकटी वावरता असताना इतर गोष्टीचा अचानकपणे होणा-या आक्रमण पुरूषांप्रमाणे ती प्रतीकार करू शकत नाही किंवा ती आणखी पूर्णतः सक्षम नसल्याने ही संस्कृती प्रागैतीहासीन काळापासून अस्तीत्वात आहे.

आधुनिक निसर्गाच्या बदलत्या काळानुसार वरचेवर घडतच आहेत. स्त्रि ही चार भिंतीच्या किंवा सोनेरी

पिंज-यात न राहता आता या खुल्या जगात मनमोकळेपणाने वावरण्यास सुरूवात करत आहे. पुरूषांच्या खांदयाशी खांदा लावून ती प्रत्येक क्षेत्रात आपल कौशल्य सिध्द करून दाखवत आहे. विशेष म्हणजे ती स्वतःतील कलागुणांचा वापर जगण्यासाठी करत आहे. पण हे करत असताना आजच्या दैनंदीन वर्तमानपत्रांमध्ये काही अशा घटना डोळयासमोर वाचण्यात येतात की एका स्त्रिवर सामुहीक अत्याचार, अल्पवयीन मुलीवर बलात्कार, हे कसे घडते? यावर थोडा फार स्त्रियांनी विचार म्हणा किंवा अभ्यास करायला हवा. हा होणारा अत्याचार आपल्याच चुकिमुळे होतोय का? यावर स्त्रियांनी विचार करणे ही काळाची गरज आहे असे मी समजतो. विचार करून तिने आपले अस्तित्व पुढे या जगात कायम टिकवण्यासाठी व पुरूषांच्या बरोबरीने स्वतःमध्ये काही बदल करून घ्यायला हवेत. काही बंधन, नियम स्वतःवर तिने करायला हवीत असे माझे मत आहे अन्यथा त्यांना त्यांचे व्यक्तिस्वातंत्र आहेच.

संदर्भ सुची

१. विश्वास पाटील. झाडाझडती. राजहंस प्रकाशन
२. दया पवार. बलुत. दिनकर गांगल चिटणीस ग्रंथाली.
३. किशोर शांताबाई काळे. कोलाटयाचे पोरं. ग्रंथाली प्रकाशन.
४.वामनराव पै. दृष्टी. शितल प्रकाशन
५.शिवाजी सावंत. मृत्युंजय
६. रणजित देसाई. श्रीमानयोगी
७. साने गुरूजी. शामची आई
८. एर्डोल्फ हिटलर. माझा लढा
९. अब्दुस सलाम चाउस. यशशास्त्र
१०. संध्या रानडे. निरोप. पायल प्रकाशन
११. शकुंतला गोमटे. हे प्रेम जगावेगळे. मनोरमा प्रकाशन
१२. महेश निकम. सावली. विनंद प्रकाशन
१३. अविनाश धर्माधिकारी. नवा विजयपथ
१४. विश्वास देशमुख. प्रेमांजली
१५. भागन. रा. तु. जिवनविचार. दिया प्रकाशन
१६. महात्मा फुले. ब्राम्हणाचे कसब.



***तुकाराम परसराम डोके***
दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org